**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ५५४/२०१९**

**तक्रारकर्ता, श्री. गुलाब रामाजी कावळे,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक,**
उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, पवनी ता. पवनी जि. भंडारा

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपअधिक्षक,**
उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, पवनी ता. पवनी जि. भंडारा

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : ०२.०६.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | अनुपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | उपस्थित |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| १२.०६.२०१९ | --- | ०७.११.२०१९ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. ३६९६/२०१८ मध्ये दिनांक १२.०६.२०१९ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक ०२.०६.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उपअधिक्षक भूमी अभिलेख पवनी, तहसिल कार्यालय जवळ पवनी, ता. पवनी जि. भंडारा श्री. सु.रा. बडगे तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. मिलींद रा. शिंदे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप अधिक्षक भूमी अभिलेख पवनी अतिरीक्त पदभार श्री. शे. वा. कापसे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. ३६९६/२०१८ मध्ये दिनांक १२.०६.२०१९ रोजी सुनावणी घेवून " जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम २(च) नुसार माहिती याचा अर्थ माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार एखादया विषयावर सल्ला मागणे, एखादी कार्यवाही पूर्ण करुन माहिती देणे, एखादया कार्यवाही मागील खुलासा अथवा कारण देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादया कार्यवाहीची अपेक्षा करणे इत्यादी बाबीचा या व्याख्येमध्ये समावेश होत नाही. परंतु अपिलार्थी याची माहितीची गरज लक्षात घेता उपरोक्त प्रमाणे नमुद विषयाशी सबंधित परिपत्रकाची प्रत आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी" असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक ०७.११.२०१९ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलार्थी यांनी व्दितीय अपिल क्रमांक ३६९६/२०१८ मध्ये दिनांक १२.०६.२०१९ रोजी पारित आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवून तक्रार अर्ज दाखल केला. वरील आदेशाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मोजणीच्या नकाशामध्ये धारकाचे वहीवाट क्षेत्र, नकाशा क्षेत्र, ७/१२ किंवा आधिव पत्रिकेनुसार क्षेत्रांचा खुलासा करण्यात येत नाही. याबाबतचे परिपत्रक मागितलेले आहे. ही बाब लक्षात घेता, परिपत्रकाची प्रत अपिलार्थी यांना १५ दिवसात उपलब्ध करून देण्याबाबत निर्देशित करण्यात आले. वरील आदेश प्रत्यक्षात दि. ३०.०८.२०१९ रोजी निर्गमित करण्याल आले. वरील आदेशाची लेखी प्रत प्राप्त होण्याच्या आधी दि. ०१.०७.२०१९ रोजी पारिपत्रकाची प्रत अपिलार्थी यांना प्रदान करण्यात आली असल्याचे आढळून येते. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख यांच्या प्रतीत त्यांच्या स्वत:च्या जागेच्या आक्षेपाविषयी पत्रात भाष्य केले आहे. आयोगाने पारित आदेशात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना परिपत्रकाची प्रत विहीत मुदतीत प्रदान केली असल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०२.०६.२०२३**

**जा.क्र.**--4018--**दि.**------------
3 C AUG 2023



E:\SS/ तक्रार ०२.०६.२०२३\५५४-२०१९ गूलाब कावळे.docx